दैनिक
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
Page 3
15 Sep 2024
# जनप्रभात

## सायबर सेक्युरिटी ही काळाची गरज



**परभणी** ■ अरविंद कांबळे

पूर्णा:आज दि १४ सप्टेंबर २०२४ रोजी गुरु बुद्धिस्वामी महाविधालय पूर्णा येथे सायबर सुरक्षा या विषयावर लातूर येथील सायबर वॉरियर क्लब चे अध्यक्ष प्रतिक वर्मा यांनी युवकाना मार्गदर्शन केले. सध्या तरुण पीढी समोर असणारे समाज माध्यमातील वेगवेगळे धोके व त्यांच्या पासून सावध राहन्याकरीता उपाय त्यानी आपल्या भाषणात् नमुद् केले. मोबाईल चा वापर आज सर्वत्र होताना दिसतो केवळ संभाषणासाठी हे साधन मर्यादित राहिले नाही तर सामाजिक माध्यम तसेच आर्थिक व्यवहार या माध्यमातून होतात यात बऱ्याच वेळा विविध प्रलोभन दाखवून लोकांकडून फसवण्याचो प्रकार झाल्या अनेक उदाहरणे आजूबाजूला पाहायला मिळतात अशावेळी इंटरनेटचा वापर करताना आणि व्यवहार करताना अतिशय दक्ष राहून आपल्या वैयक्तिक माहिती चा कोणी गैरफायदा घेऊ नये याची दक्षता सर्वांनी घ्यावी यासंबंधी आजच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले, कार्यक्रमासाठी कार्यक्रमास प्राचार्य डॉ. के. राजकुमार उपप्राचार्य, शिवसांब कापसे व गजानन कुरुन्दकर , उमाशंकर मिटकरी , बाहेती सर यांची उपस्थिती होती.